# महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील मार्गदर्शकता

**डॉ.तेजस्विनी बाजीराव मुडेकर,** प्राचार्या, कमला कॉलेज, कोल्हापूर. भ्रमणध्वनी - ९०४३४३४००

---

***''आणखीन काही वर्षांनी या भूतलावर गांधी नावाचा हाडामासाचा माणूस झाला होता, यावर लोकांचा विश्वास बसणार नाही''***

**- अल्बर्ट आईनस्टाईन**

**प्रास्ताविक :** महात्मा गांधी हे क्रियाशील राजकारणी व कृतिशील विचारवंत होते. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधींकडे आल्यानंतर त्यांनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनाला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. हिंदू-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण आणि ग्रामोद्धार असे कार्यक्रम स्वीकारून त्यांनी सामाजिक एकीकरणास चालना दिली. खेड्याकडे चला हा संदेश त्यांनी दिला. सुशिक्षित समाजाने खेड्याकडे जाऊन खेड्यातील लोकांचे जीवन आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उन्नत करावे व त्यासाठी श्रमप्रतिष्ठा त्यांनी महत्त्वाची मानली. विषमतावादी समाजरचनेत सामाजिक अभिसरणा-शिवाय समता मूल्य निर्माण होणार नाही. समाजातील 'आहे रे' वर्गाने समाजाच्या विश्वस्ताची भूमिका स्वीकारावी व 'नाही रे' वर्गाने धन निर्मितीतील आपला योग्य वाटा निर्भिडपणे मागावा. अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार म.गांधींनी अत्यंत प्रभावीपणे मांडले.

**शोध निबंधाचा उद्देश :**

१. म.गांधींची वैचारिक जडण-घडण अभ्यासणे.

२. म.गांधींचे आर्थिक विचार अभ्यासणे.

३. म.गांधींच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील मार्गदर्शकता अभ्यासणे.

**अभ्यास पद्धती :** सदर शोधनिबंध हा दुय्यम सामग्रीवर आधारित असून लेखनासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, म.गांधींचे वैचारिक लेखन खंड, यांचा आधार घेतला आहे.

**महात्मा गांधींची वैचारिक जडण-घडण :** महात्मा गांधींच्या वैचारिक जडण-घडणीमध्ये जगभरातील विचारवंत व तत्वज्ञ यांच्या विचारांचे योगदान आढळते. म.गांधींच्या घरचे वातावरण धार्मिक होते. त्यांच्या घरी पारशी, मुस्लिम, जैन तसेच हिंदू धर्मातील विद्वान व्यक्तींची विविध धर्मातील तत्वज्ञानावर चर्चा चाले. त्यामुळे बालपणीच सर्व धर्म समभावाचे संस्कार त्यांच्यावर झाले. गांधींनी मानवकेंद्रित अध्यात्मवाद स्वीकारला होता. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्वात हिंदू धर्मातील अध्यात्मवाद व ख्रिस्ती धर्मातील मानवतावाद यांचे मिश्रण आढळते. तुलसीदासांचे 'रामचरित मानस', गीता, भागवत बुद्ध चरित्र या ग्रंथांचा प्रभाव त्यांच्या मनावर होता. इंग्लंडमध्ये असताना एडवर्ड अर्नाल्ड लिखित 'गीता' व कार्लाईल लिखित महंमद पैगंबर यांच्या जीवनावरील 'Hero and Heroship' या ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास त्यांनी केला होता. जैन धर्मातील अहिंसा व स्यादवाद या बाबी त्यांना श्रेष्ठ वाटत होत्या. विविध धर्मातील उत्तम तत्वे आपल्या धर्मात समाविष्ठ करून आपल्या धर्माचा विकास करावा असा स्यादवादाचा अर्थ त्यांनी लावला. दादाभाई नौरोजींचा ब्रिटिश राज्यकर्ते भारतातील संपत्तीचे प्रचंड शोषण करून स्वदेशी नेत आहेत यावर आधारलेला 'संपत्तीच्या निस्सारणाचा सिद्धान्त' त्यांना मान्य होता. ना.गोपाळकृष्ण गोखलेंना गांधीजी राजकीय गुरू मानत. नीतीमूल्यांशी विसंगत असलेल्या कोणत्याही कायद्याला शांततेने विरोध करण्याचा प्रत्येक नागरिकाला हक्क आहे अशी भूमिका अमेरिकन केंद्र शासनाच्या गुलामगिरी चालू ठेवण्याच्या धोरणाविरूद्ध बंड पुकारताना हेन्री थोरो यांनी मांडली व ही भूमिका गांधींना पटली. रस्किन यांच्या 'Unto This Last' या पुस्तकाचा त्यांनी 'दर्वोद्य' या नावाने अनुवाद केला. नफ्यावर आधारित अर्थनितीचा

धिक्कार करून श्रमप्रतिष्ठा व सामाजिक न्यायावर आधारित अर्थव्यवस्था त्यांना मान्य होती. रस्किन यांच्या 'सेंट जॉर्जेस गिल्ड' संस्थेमार्फत शेती सुधारणा, ग्रामीण उद्योगांचे पुनरूज्जीवन व शिक्षण पद्धतीत सुधारणा ही कामे केली जात होती. त्याच मार्गाने आपण जावे असे विचार त्यांच्या मनात घोळत होते. लिओ टॉलस्टॉय यांच्या 'Kingdom of the God is within you' या ग्रंथाचे वाचन केल्यानंतर नीतीच्या कसोटीला न उतरणारी धर्मशासनातील वचने किंवा धर्मपीठाच्या आज्ञांना विरोध करून आपल्या अंत:प्रेरणेशी इमान राखले पाहिजे. वेदांतील अस्पृश्यता, विषमता व अनितीचे समर्थन करणारी वचने धर्मविरोधी आहेत असे मानून त्यांनी आंदोलने केली.

**महात्मा गांधींचे आर्थिक विचार :** महात्मा गांधींनी आपले आर्थिक विचार हे क्रमबद्ध रूपाने मांडले नाहीत. त्यांनी वेगवेगळ्या वेळी दिलेल्या व्याख्यानातून, लिखाणातून व पत्रव्यवहारातून प्रकट केलेल्या आर्थिक विचारांचा मागोवा आपणास घेता येतो.

**अर्थशास्त्राचे उद्दिष्ट :** महात्मा गांधींनी अर्थशास्त्र हे नीतीशास्त्राशी संबंधित आहे असे मानले आहे. त्यांच्यामते, ''जे अर्थशास्त्र नैतिक व भावनात्मक मूल्याकडे लक्ष देत नाही ते अर्थशास्त्र ज्यात जीवन असूनही सजीव जीवनाचा अभाव असतो अशा एका मधमाश्यांच्या पोळ्याप्रमाणे आहे.'' मानवाच्या कल्याणाचा विचार न करणारे अर्थशास्त्र त्यांना मान्य नव्हते. बर्ट्रांड रसेल या पाश्चात्य तत्ववेत्यांनी महात्मा गांधींच्या या दृष्टिकोनाचे समर्थन केले आहे.

**विश्वस्त संकल्पना :** महात्मा गांधींच्या आर्थिक विचारात विश्वस्त ही संकल्पना महत्वाची मानली जाते. संपत्ती ही ईश्वराची असल्याने तिच्यावर सर्व समाजाची मालकी असली पाहिजे. भांडवलशाही पद्धतीतील दोष दूर करण्याच्या उद्देशाने महात्मा गांधींनी विश्वस्त संकल्पना मांडली. एखाद्याला उद्योगामध्ये संपत्ती मिळाली तर ती सर्व संपत्ती त्याच्या मालकीची नाही. तर इतर सर्व लोकांसारखे सन्माननीय जीवन जगण्यास जी संपत्ती आवश्यक आहे तेवढ्याच संपत्तीवर त्याचा हक्क आहे. उरलेली संपत्ती संपूर्ण समाजाची असून तिचा समाज कल्याणार्थ वापर करावा. संपत्तीची जोपासना विश्वस्त म्हणून करावी. व्यवस्थित जीवन जगण्याकरिता जसे किमान जीवन वेतन असावे त्याप्रमाणे व्यक्तीला मिळणाऱ्या उत्पन्नाची कमाल मर्यादा असावी. किमान उत्पन्न व कमाल उत्पन्न ह्यातील फरक योग्य असला पाहिजे व तो नाहीसा करण्याची प्रवृत्ती असली पाहिजे.

**औद्योगिकरण :** निर्जीव यंत्राने सजीव मानवाला आपला दास बनविता कामा नये. म.गांधींना मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या सामाजिक व आर्थिक दुष्परिणामांची कल्पना होती. यंत्रावरील काम कंटाळवाणे व साचेबंद असते. व्यक्तीच्या कार्यक्षमतेला पूर्ण वाव दिल्याशिवाय व्यक्तीचा शारीरिक, मानसिक व चारित्र्याचा विकास होऊ शकत नाही. भारतात श्रम पुरवठा मुबलक असल्याने श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर करावा. काही मूठभर भांडवलदार यंत्रांचा वापर करून लाखो कामगारांना बेकार करू शकतात. अशा भांडवलदारांच्या हातात संपत्तीचे केंद्रिकरण होते, व या केंद्रिकरणाचे दुष्परिणाम भोगावे लागतात. सुरवातीला म.गांधींचा यांत्रिकीकरण, औद्योगिकरण याला तीव्र विरोध होता मात्र नंतर जर यंत्रांच्या वापराने कामगारांमध्ये बेकारी वाढणार नसेल व यंत्रेही श्रमिकांची कार्यक्षमता वाढवणारी असतील तर त्यांनी विरोध केला नाही. झोपड्यांमधील लाखो गरीबांना उपयुक्त ठरणाऱ्या त्यांचा भार कमी करणाऱ्या यंत्रांच्या वापराला त्यांचा विरोध नव्हता तर लाखो लोकांना बेकार करून त्यांच्या जीवनाशी खेळ करणाऱ्या यंत्रांना त्यांनी विरोध केला. अर्थविज्ञान हे स्वार्थ विज्ञान होऊ नये असे मत त्यांनी मांडले.

**श्रमिकांचे कल्याण :** म.गांधींनी शारीरिक श्रमाला महत्व दिले. बालकामगार ही मानवतेला काळीमा फासणारी गोष्ट आहे. हरिजन अंकातून कामगारांविषयी लिहिताना ते नेहमी कामगारांना योग्य वेतन व मान-

सन्मान मिळावा यावर भर देत. श्रमिकांच्या श्रमातून संपत्ती निर्माण होते. समाजातील गरीबांच्या सहकार्याशिवाय श्रीमंतांकडील धनसंचय वाढू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. १९३८ साली जुलैच्या हरिजन अंकात म.गांधींनी असे मत मांडले की, कारखान्याच्या भल्यासाठी भागधारकांइतकेच कामगारांनाही महत्व दिले पाहिजे. व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग वाढविला तर कारखान्याचे उत्पादन वाढेल. औद्योगिक शांतता निर्माण होऊन विकास होईल. कामगार संघटनांनी सभासदांचे हित व हक्कांचे रक्षण करावे. कामगारांचा शारीरिक, बौद्धिक, नैतिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडवून आणला पाहिजे. कामगार व भांडवलदार यांचे मैत्रीपूर्ण संबंध असावेत.

**ग्रामीण विकासाची सप्तसुत्रे :** म.गांधींच्या मते खरा भारत हा खेड्यात रहातो. देशातील ७ लाख खेड्यांचा विकास हाच देशाचा विकास. ग्रामोद्योगावर त्यांचा भर होता. खेड्यातील कारागीर, छोटे उद्योग करणारे लोक यांना ग्रामीण भागातच उदरनिर्वाह करण्यासाठी पुरेसे काम व पुरेसा रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. त्यासाठी त्यांनी ग्रामीण विकासाची पुढील सप्तसूत्रे सांगितली.

१. योग्य पद्धतीचा वापर करून अन्नधान्य उत्पादन वाढ व ग्रामीण जनतेच्या मत परिवर्तनाद्वारे जमिनीचे फेरवाटप.

२. ग्रामीण समाज आरोग्य संपन्न होण्यासाठी जनशिक्षणाद्वारे आहार मार्गदर्शन.

३. सदृढ व निरोगी जीवनासाठी राष्ट्रीय स्वच्छता मोहीम.

४. कुटिरोद्योग व ग्रामोद्योग यामध्ये सुधारणा करून प्रादेशिक स्वयंपूर्णता प्रस्थापित करणेसाठी प्रयत्न करून सहकार वृत्तीस प्रोत्साहन.

५. सार्वत्रिक शिक्षण पद्धती, ज्यामध्ये किमान ज्ञान व माहिती संपादन करता येईल. शिक्षणापासून कोणी वंचित रहाणार नाही.

६. स्वयंशासन पंचायती व खऱ्या शासन व्यवस्था असतील.

७. सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाद्वारे जनतेत हक्कांविषयी जाणीवजागृती.

**विकेंद्रिकरण, कुटिर व लघु उद्योगांची स्थापना :** म.गांधींच्या मते आर्थिक केंद्रिकरण नष्ट करण्यासाठी, बेकारी कमी करण्यासाठी व देशातील नागरिकांचे कल्याण साध्य करण्यासाठी लघु उद्योगांची प्रस्थापना करणे आवश्यक आहे. घरगुती स्वरूपात जे उद्योग चालवले जातात त्यामधील यंत्रे लहान, साधी व चालविण्यास सोपी असतात त्यांचा खर्चही कमी येतो त्यामुळे ते घरोघरी प्रस्थापित केले जाऊ शकतात. अशा उद्योगधंद्यांमुळे केवळ उद्योगांचे विकेंद्रिकरणच होते असे नाही तर राष्ट्रीय उत्पन्न, नफा व आर्थिक सत्तेचेही विकेंद्रिकरण होते. ज्या ठिकाणी कच्चा माल उपलब्ध होतो तेथेच पक्का माल निर्माण केला जात असल्याने ग्रामीण हातांना काम मिळेल, रोजगार निर्माण होईल.

**संसाधने वापराबाबतची निती :** म.गांधींनी संसाधनांवर आधारित नितीचा अभ्यास करून देशाच्या विकासासाठी कोणती अर्थनिती योग्य आहे याचे विश्लेषण केले आहे. त्यांनी दोन नितींचे स्पष्टीकरण केले आहे. अ) सागरी अर्थनिती, ब) तलाव अर्थनिती. त्यांच्यामते जी संसाधने विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा संसाधनांचा वापर करावा अशा धोरणाला ते सागरी अर्थनिती म्हणतात. जी संसाधने मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत त्यांचा वापर मर्यादित प्रमाणात करावा याला तलाव अर्थनिती म्हणतात.

**स्वदेशीचे तत्वज्ञान :** व्यापारवाद, व्यापारी संरक्षणवाद किंवा फ्रेडरिक लिस्ट चे व्यापारी संरक्षण याच विचारांप्रमाणे म.गांधींचे स्वदेशीचे तत्वज्ञान होते. त्यांच्यामते स्वदेशीचा विचार हा फक्त आर्थिक प्रश्नांपुरता नाही तर तो राजकारण, संस्कृती व धर्म यांनाही लागू होतो. पिळवणूकरहित अर्थव्यवस्था हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त उपभोग संग्रह यांचा त्याग, सर्व प्रकारच्या प्रच्छन्न चोरीचा त्याग, प्रत्येकाने श्रमावर जगणे व ‘स्वदेशी’ उत्पादन व उपभोगाच्या सर्व क्षेत्रात स्वदेशीचा आग्रह. स्वत:च्या

साधनसामग्रीची माहिती करून घेणे, त्यांचा गरजपूर्तीसाठी वापर करणे हा एक अर्थ व दुसरा अर्थ आयातीवरचे अवलंबन टाळणे. परकीय मालावर बहिष्कार टाकणे. खऱ्या स्वदेशीसाठी म.गांधींनी दोन निकष मांडले.

अ) रोजगार व उत्पन्नात स्थानिकांचा हिस्सा.

ब) उत्पादन व्यवस्थेने नियंत्रण भारतीयांच्या हातात.

स्वदेशी चळवळ ही असहकार व स्वावलंबन यांची अभिव्यक्ती होती.

**सर्वोदय संकल्पना :** सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय. सर्वोदयात संपूर्ण समाजाच्या हिताचा तसेच कल्याणाचा विचार अभिप्रेत आहे. सर्वांना समान विकासाची संधी उपलब्ध असेल. सर्वोदय समाजाचे आर्थिक स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.

अ) सर्वोदयी समाजात ग्रामीण व्यवस्थेवर भर दिला जाईल व ग्रामोद्योगांना प्राधान्य दिले जाईल.

ब) सर्वोदयी समाजात शोषणमुक्त समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने खाजगी मालमत्ता नष्ट केली जाईल.

क) सर्वोदयी समाजात विश्वस्त संकल्पना असेल.

ड) सर्वोदयी समाजात भूदान, संपत्तीदान, श्रमदान, जीवनदान यांना प्राधान्य असेल.

**शिक्षणविषयक विचार :** म.गांधींच्या मते माणसाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ति म्हणजे शिक्षण. शिक्षणाला प्रारंभ करताना एखादा उपयुक्त असा हस्त व्यवसाय शिकविणे व त्याची उत्पादन क्षमता वाढविणे. शिक्षण हे जीवनोपयोगी असावे. स्त्रीशिक्षण ही गरजेची बाब आहे. शिक्षण हे मातृभाषेतून द्यावयास हवे. म.गांधींची अत्यंत महत्त्वाची संकल्पना म्हणजे मूलोद्योगी शिक्षण पद्धती इ.स.१९३७ साली म.गांधींनी आपले विचार शिक्षणतज्ज्ञांपुढे मांडले. यामध्ये ७ ते १४ वयोगटाच्या मुलांना शिक्षण सक्तीचे व विनाशुल्क असावे, शिक्षण मातृभाषेतून असावे, शिक्षणात हस्त व्यवसायाला महत्व असावे, शिक्षण स्वाश्रयी असावे म्हणजेच विद्यार्थी ज्या वस्तू शाळेत तयार करतील त्या उत्पादनाची विक्री करून शाळेतील शिक्षकांचे वेतन व शाळेचा इतर खर्च भागविला जाईल. शिक्षणात शारीरिक शिक्षण सक्तीचे हवे.

**म.गांधींच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील मार्गदर्शकता:** म.गांधींचे सत्याग्रहाचे साधन हे संघर्ष, अन्याय, विषमता, दारिद्रय नष्ट करण्याचे एक महत्वाचे साधन आहे. आजच्या काळात अनेक आर्थिक व सामाजिक अन्यायाविरूद्ध त्याचा वापर करणे अपरिहार्य आहे. आजच्या प्रचंड वाढलेल्या विषमतेच्या पार्श्वभूमीवर निगम क्षेत्रात विश्वस्त संकल्पना वापरणे आवश्यक आहे. कामगारांचे वेतन वाढविणे, उत्पादनाचा दर्जा सुधारणे, उत्पादन सामान्य ग्राहकांना वाजवी किंमतीला विकणे व उरलेल्या नफ्यातून निगम क्षेत्राने सामाजिक जबाबदारी उदा.शिक्षण, सिंचन, आरोग्य, रस्ते सुविधा स्वीकारून मागास समाजाचा विकास करणे या बाबी अपेक्षित आहेत. 'खेड्याकडे चला' हा संदेश महत्वाचा वाटतो. शहरीकरणाचे विविध प्रश्न - गुन्हेगारी, झोपडपट्टी, सामाजिक तणाव, वहातूक व प्रशासन व्यवस्थेवरील ताण या सर्वांचा विचार करता आज म.गांधींच्या 'स्वयंपूर्ण खेडे' या संकल्पनेचे आधुनिकीकरण करून ती संकल्पना वापरणे आवश्यक आहे. स्थानिक मालाचा वापर करून विकेंद्रीकरण करून स्थानिक जनतेला काम देऊन Local to Gobal उद्दिष्ट साध्य करता येईल. आजच्या काळातील गैर आहार, आचार, विचार पद्धतीशी निगडीत रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, एड्स, कॅन्सर या रोगांचा विचार करता, म.गांधींचे स्वदेशीचे तत्वज्ञान स्वयंपूर्णतेबरोबरच रोजगार निर्मिती बरोबरच वरील संदर्भानेही वापरणे संयुक्तिक वाटते. बाजारपेठेचे जागतिक स्वरूप, माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर, कमालीची स्पर्धा या पार्श्वभूमीवर मालक-कामगार सहकार्य, कामगारांच्या कार्यांतर्गत शिक्षणाची आवश्यकता अधोरेखित करतो. आत्मनिर्भर भारत,

स्वावलंबी भारत, स्टार्टअप या सर्वांमागे म.गांधींच्या आर्थिक विचारांचाच धागा सापडतो. कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यापार बंद झाला. तेव्हा स्वदेशीनेच आपण तरू शकलो. औद्योगिकरणामुळे जागतिकीकरणामुळे आज संपूर्ण ग्रामव्यवस्था उध्वस्त झाली आहे. वाढते दारिद्रय, आर्थिक विषमता, शेतकरी आत्महत्या, शहरांकडे स्थलांतर या समस्यांवरील उपाय म्हणजे म.गांधींची अर्थनिती. आजच्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मातृभाषेतून शिक्षण, शालेय स्तरावर व्यावसायिक शिक्षण, महाविद्यालयीन प्रत्येक टप्प्यावर कौशल्यावर आधारित शिक्षण या विचारांचे स्त्रोत म.गांधींच्या शैक्षणिक विचारात सापडतात.

**निष्कर्ष :** म.गांधींच्या विचारांची बैठक ही जगातील अनेक विचारवंत व तत्वज्ञ यांच्या वैचारिक योगदानाने तयार झाली होती. कल्याणकारी अर्थशास्त्राचा त्यांनी विचार केला. संपत्तीच्या केंद्रिकरणास त्यांचा विरोध होता. संपत्तीच्या जोपासनेसाठी विश्वस्त संकल्पना त्यांनी मांडली. बेकारी वाढविणाऱ्या यांत्रिकीकरणाला ते विरोध करत. श्रमकल्याण त्यांनी महत्वपूर्ण मानले. ग्राम विकासाची सप्तसूत्रे त्यांनी मांडली. उद्योगांचे विकेंद्रीकरण करून लघु व कुटिरोद्योगांच्या स्थापनेवर त्यांनी भर दिला. संसाधनांचा जपून वापर करावा. स्वदेशी हाच देश स्वावलंबनाचा मार्ग आहे. मूलोद्योगी जीवनोपयोगी शिक्षणपद्धतीच विकासाचा मार्ग दाखवेल यावर त्यांचा विश्वास होता. आजच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय अस्थिरतेच्या काळात म.गांधींच्या विचारांच्या आधाराने मार्गक्रमण केल्यास शाश्वत विकास साध्य होईल.

**संदर्भ ग्रंथ :**

१. Mathur J.S. & Mathur A.S.(1962), 'Economic Thoughts of Mahatma Gandhi', Chaitanya Publishing House, Allahabad.
२. Das Amritanandan (1979), 'Foundation of Ghandhian Economics', Allied Publishers, Bombay.
३. Narayan Shriman (1970),'Relevance of Ghandhian Economics', Navajivan Publishing House, Ahmedabad.
४. Dr.G.Ranjit Sharma (1995) 'An Introduction to Gandhian Thought', Atlantic Publishers, New Delhi.
५. पंडित नलिनी (१९९७), 'गांधी', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
६. चौगुले सहदेव (२००६), 'पाथेय', अजब प्रकाशन, कोल्हापूर.
७. गांधी मो.क.(१९९७), पटवर्धन सीताराम पुरूषोत्तम (मराठी अनुवाद)'सत्याचे प्रयोग' अथवा आत्मकथा.
८. गांधी, (२००९), 'हिंदी-स्वराज्य', प्रकाशक दत्ता शिंदे, गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
९. 'देश विदेशातील व्यवस्थापन गुरू आणि महान व्यक्तिमत्वांचे योगदान', (२०१५), संपादन - डॉ.स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
१०. 'प्रबोधन प्रकाशन ज्योती-मासिक', सप्टेंबर-ऑक्टोबर २०१८, ऑक्टोबर २०२१, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.
११. New Education Policy : 2020.